## प्रकरण चौथे

### अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि., अंकलखोप

### या संस्थेची भांडवली रचना, कर्जपुरवठा (अल्प व मध्यममुदत) आणि थकबाकी

# प्रकरण चौथे

## अंक्लखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंक्लखोप या संस्थेची मांडवली रचना, कर्जपुरवठा ( अल्प व मध्यम मुदत ) आणि थकबाकी

### विभाग पहिला

**अंक्लखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंक्लखोप या संस्थेची मांडवली रचना:**

प्राथमिक सहकारी पतसंस्थांची मांडवली रचना सर्वसाधारणपणे स्वत:च्या मालकीचे निधी आणि बाहेरून मांडवल उभारणी यावरच अवलंबून असते. याप्रमाणेचे अंक्लखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या मांडवली रचनेमध्येही पुढील दोन भाग आहेत.

अ) संस्थेच्या मालकीचे निधी

ब) संस्थेने उभारलेले निधी

संस्थेच्या मालकीच्या निधीमध्ये भागभांडवल व राखीव आणि इतर निधी यांचा समावेश असतो. संस्थेने उभारलेल्या निधीमध्ये संस्थेकडे असणाऱ्या ठेवी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जासह इतर कर्जे असतात. अशा दोन्ही भागातील निधींचे मिळून एकत्रित संस्थेचे खेळते भांडवल निर्माण झाले आहे.

अ) **संस्थेच्या मालकीचे निधी:**

भागभांडवल आणि संस्थेच्या विकासासाठी संस्थेने स्वत:च्या नफ्यातून निर्माण केलेला राखीव व इतर निधी यांचे एकत्रिकरणामधून हा निधी तयार होतो.

हा निधी संपूर्णपणे संस्थेच्या मालकीचा असल्याने अशा भांडवलावरती संस्थेला व्याज द्यावे लागत नाही. तसेच संस्थेच्या गरजेनुसार यातील भांडवल वापरता येते. त्यामुळेच याला मालकीचा निधी असे म्हटले जाते. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या बाबतीत संस्थेचे भागभांडवल आणि निधी पुढीलप्रमाणे आहेत.

१) भागभांडवल:

१९६० पूर्वी अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे भागभांडवल अत्यंत कमी होते परंतु जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून मिळणारा पतपुरवठा हा भागभांडवलावर आधारीत असल्याने पुढील काळातील सभासदांची कर्जाची गरज पूर्ण करण्यासाठी भागभांडवलात सतत वाढ करण्यात आली आहे. १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामधील संस्थेच्या भागभांडवलाची रचना, तक्ता क्रमांक ४.१ वरून दिसून येते. भागभांडवलामध्ये सभासदांचे आणि सरकारी भागभांडवल असे घटक असतात. १९६९-७० पूर्वी संस्थेकडे रू.९००० इतके सरकारी भागभांडवल होते. ते संस्थेने १९६९-७० मध्येच परत केले आहे. त्यामुळे या संस्थेत फक्त सभासदांचे भागभांडवल आहे.

१९७०-७१ मध्ये संस्थेचे भागभांडवल रू.१११८६७५ इतके होते. पुढील काळात त्यामध्ये सतत वाढ झाली आहे. १९७९-८० मध्ये रू.२०३२४१० आणि १९८५-८६ पर्यंत रू.२९२७९०० इतकी वाढ भागभांडवलात झाली आहे (तक्ता क्रमांक ४.१). १९७०-७१ ते १९८५-८६ या संपूर्ण काळातील ही वाढ सुमारे तीन पट इतकी आहे. सदर काळामध्ये अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने सरकारी भागभांडवल स्वीकारलेले नाही (तक्ता क्रमांक ४.१). १९७२-७३ ते १९७४-७५ या काळामध्ये भागभांडवलाचा वार्षिक वृध्दीदर इतर वर्षांच्या तुलनेत जास्त आहे. १९७४-७५ साली ११.३७ टक्के इतका वृध्दीदर आहे.

या वर्षातील ही वाढ सर्वाधिक आहे. याउलट १९७६-७७ साली भागभांडवलात वाढ झाली नाही (तक्ता क्रमांक ४.१).

तक्ता क्रमांक ४.१

-: भागभांडवलाची रचना :-

| वर्ष | सभासदांचे भागभांडवल रक्कम रु. | सरकारी भागभांडवल रक्कम रु. | एकूण भागभांडवल रक्कम रु. | एकूण भागभांडवलाचा वार्षिक वृध्दीदर टक्के |
|---|---|---|---|---|
| १९७०-७१ | ११९८६७५ | - | ११९८६७५ | + ७.९९ |
| १९७१-७२ | १२७८१८५ | - | १२७८१८५ | + २.४८ |
| १९७२-७३ | १४०९८१५ | - | १४०९८१५ | + ९.३४ |
| १९७३-७४ | १५४३१३५ | - | १५४३१३५ | + ८.६४ |
| १९७४-७५ | १७४१०४० | - | १७४१०४० | +११.३७ |
| १९७५-७६ | १८२३३७५ | - | १८२३३७५ | + ४.५२ |
| १९७६-७७ | १७९७२८० | - | १७९७२८० | - १.४३ |
| १९७७-७८ | १८७६७१५ | - | १८७६७१५ | + ४.२३ |
| १९७८-७९ | १९६८०४० | - | १९६८०४० | + ४.६४ |
| १९७९-८० | २०३२३१० | - | २०३२३१० | + ३.१६ |
| १९८०-८१ | २१९४३१० | - | २१९४३१० | + ७.३८ |
| १९८१-८२ | २४०८३२० | - | २४०८३२० | + ८.८९ |
| १९८२-८३ | २५६७६०० | - | २५६७६०० | + ६.२ |
| १९८३-८४ | २६७५०८० | - | २६७५०८० | + ४.२ |
| १९८४-८५ | २८००८३० | - | २८००८३० | + ४.४९ |
| १९८५-८६ | २९२७९०० | - | २९२७९०० | + ४.५३ |

१९७०-७१ ते १९८५-८६ या काळातील भागभांडवलाबाबत पुढील वैशिष्टये सांगता येतील:-

१) १९७६-७७ हे अपवादात्मक वर्ष सोडता भागभांडवलात प्रतिवर्षी सतत वाढ झालेली आहे.

२) सभासदसंख्येमध्येही झपाटयाने वाढ झाल्यामुळे भागभांडवल वाढण्यास मदत झाली आहे.

३) सभासदांची कर्जमागणी मोठया प्रमाणात असल्यामुळे आणि कर्ज रक्कमेमधून शेअर रक्कम कपात करीत गेल्यामुळे भागभांडवल वाढले आहे.

४) १९८३-८४ नंतरचे काळामध्ये भागभांडवलातील वार्षिक वाढ अत्यंत कमी आहे.

५) सदर काळात संस्थेला सरकारी भागभांडवलाची गरज भासली नाही. तसेच त्यामुळे येणारी सरकारी बंधने नकोत यासाठी संस्थेने सरकारी भागभांडवल स्वीकारलेले नाही.

२) राखीव आणि इतर निधी:

कोणतीही सहकारी संस्था भविष्यातील संभाव्य आर्थिक धोके नुकसान टाळण्यासाठी राखीव निधीची निर्मिती करते. सहकारी कायद्यान्वे सहकारी संस्थाना राखीव निधी उभारणे बंधनकारक आहे. संस्थेच्या नफ्यामधील २५ टक्के भाग दरवर्षी राखीव निधीमध्ये जमा केला जातो. राखीव निधीशिवाय संस्थेच्या विकासासाठी किंवा इतर कार्यासाठी संस्था स्वतंत्र निधी उभारू शकतात. उदा.इमारत निधी, विशेष बुडीत कर्ज निधी इत्यादि.

JI UNIVERSITY LIBRARY PUR

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे राखीव आणि इतर निधीचे वर्गीकरण आणि रचना तक्ता,क्रमांक ४.२ वरून समजून येते. या संस्थेने राखीव निधीशिवाय खालील वेगवेगळे निधी उभारले आहेत:-

१) विशेष बुडीत कर्ज निधी.

२) इमारत निधी

३) धर्मादाय निधी

४) बुडीत व संशयास्पद कर्ज निधी

५) नफा समानीकरण निधी

६) इमारत घसारा निधी

७) अनुदान निधी

८) विशेष विकास निधी

१९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या राखीव निधीमध्ये सुमारे आठ पटीने वाढ झाली आहे. १९७०-७१ साली रू.१३१०३० इतका राखीव निधी होता. तोच १९८५-८६ साली रू.८३५७०८ पर्यंत वाढला आहे (तक्ता क्रमांक ४.२). संस्थेचे आर्थिक व्यवहार अत्यंत चांगल्याप्रकारे ठेवले आहेत त्यामुळे संस्थेस आर्थिक नुकसान पोहचले नाही. पर्यायी संस्थेच्या राखीव निधीमधील रक्कम सतत वाढत गेलेली आहे. एकूण निधीमधील राखीव निधीचा हिस्सा सुमारे ६० ते ६५ टक्के इतका आहे.

विशेष बुडीत कर्ज निधी या काळामध्ये २$\frac{१}{२}$ पटीने वाढला आहे. संस्थेने इमारतीच्या गरजेसाठी १९६२-६३ पासूनच स्वतंत्र " इमारत निधी " निर्माण केलेला आहे. १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये इमारत निधी मधील रक्कम वाढलेली आहे. १९७०-७१ साली इमारत निधी रू.७८२४७ इतका

तक्ता क्रमांक ४.२

-: निधींचे वर्गीकरण :-

(रक्कम रूपये)

| | राखीव निधी | विशेष बुडीत कर्जनिधी | इमारत निधी | धर्मादार निधी | बुडीत व संशयास्पद निधी | नफा समानीकरण निधी | इमारत घसारा निधी | अनुदान १२ टक्के निधी | इतर ट्रॅक्टर-विशेष विकास निधी | एकूण निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७०-७१ | १३१०३० | ८३३६ | ७८२४७ | ३६२ | ३००० | २८८२ | ११०१० | ४५२ | ११०६३ | २४६३८२ |
| १९७१-७२ | १५२६९७ | ८७५३ | ८४९५७ | ३६२ | ३००० | ५११९ | १५१८६ | ४५७ | २९८८५ | ३००४१६ |
| १९७२-७३ | १७२८३४ | ९११९ | ८६१८० | ३६२ | ३००० | - | १९६६७ | ४६२ | ३७५८० | ३२९२७६ |
| १९७३-७४ | १९७१७१ | ९६७७ | ८६१८० | ३११ | ३००० | - | २३९५१ | ११६४ | - | ३२१४३२ |
| १९७४-७५ | २२१८९१ | १०२८३ | ९२६८० | ३११ | ३००० | - | २८१३२ | ११३९ | - | ३५७४३६ |
| १९७५-७६ | २६९५६७ | १०९४० | ११०२६३ | ६९ | ६५१६ | १५४३१ | ३२२०२ | ११३९ | - | ४४६१२९ |
| १९७६-७७ | ३२४५३९ | ११६३७ | १३०२१५ | ९१७ | १२५०२ | ३२८४१ | ३७९५१ | ११३९ | - | ५५१७४१ |
| १९७७-७८ | ३५३११३ | ११६३७ | १३९८०२ | ९१७ | १५३७८ | ११११५ | ४३६१५ | १३०६ | - | ५६६८८३ |
| १९७८-७९ | ४०५३१८ | १३२१२ | १९७४३३ | २१८७ | ११०२१ | ११११४ | ४१०१० | - | - | ६८७३७५ |
| १९७९-८० | ४४५६८० | १३२१२ | २०२३६३ | १६८६ | २२१८७ | २६९७ | ४६५१९ | - | - | ७३४३४४ |
| १९८०-८१ | ५१९५२६ | १६३४७ | २१३८४० | १२०५१ | ९८६२ | २६९७ | ५४६४१ | - | ४२४२६ | ८७१३९८ |
| १९८१-८२ | ५८४६६४ | १७३२३ | २१११९८ | ३४७२४ | १४३९५ | ७२३० | ५९८४० | - | ५४५४९ | ९९२७२३ |
| १९८२-८३ | ६५२५४० | १८३५७ | २२३६५१ | ५८१७५ | १४३९५ | ८२६२ | ७७७५७ | - | ७०८०९ | ११२४७४७ |
| १९८३-८४ | ७२२२८२ | ११४०४ | २२७३६२ | ८०२९८ | १४३९५ | ८८४३ | ९५२२६ | - | ८६२६६ | १२५४०७७ |
| १९८४-८५ | ७६०१८८ | २०४६३ | २३१६६६ | १०८१८८ | १०२३० | ११२१४ | ११२२५८ | - | - | १२५५८८६ |
| १९८५-८६ | ८३५७०८ | २१६८५ | २३५८४१ | ११३१६४ | २०६६८ | १४४२५ | १२८८६५ | - | - | १३७०३५७ |

होता तो १९८५-८६ साली रू.२३५८४१ पर्यंत वाढलेला आहे (तक्ता क्रमांक ४.२). याबरोबरच धर्मादाय निधी आणि बुडीत व संशयास्पद कर्ज निधी यामध्येही वाढ झालेली आहे. संस्थेच्या विविध विभागापैकी एकाद्या विभागास कांही कारणानी तोटा आला तर तो भरून काढता यावा यासाठी संस्थेने नफा समानीकरण निधीही निर्माण केलेला आहे. १९७३ ते १९७५ या तीन वर्षाच्या काळात या निधीमध्ये रक्कम नव्हती. पुढील काळामध्ये मात्र हा निधी सतत वाढला आहे (तक्ता क्रमांक ४.२).

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने आपल्या सभासदांना शेती उत्पादनवाढीस प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक मदत देण्याच्या हेतूने अनुदान निधी उभारला होता. विशिष्ठ शेती उत्पादन वाढीच्या योजनेसाठी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या १२ टक्के अनुदान संस्था या निधीमधून देत होती. १९७७-७८ नंतर संस्थेने हा निधी बंद केलेला दिसून येतो. इमारत घसारा निधी मधील रक्कम १९७०-७१ ते १९८५-८६ या काळात मोठया प्रमाणात वाढली आहे (तक्ता क्रमांक ४.२). विशेष विकास निधीमधील रक्कम १९७२-७३ पर्यंत ट्रॅक्टरसाठी वापरण्यात आली. शेती विकासाबरोबरच गावच्या इतर विकास कार्यामध्ये मदत करता यावी या हेतूने विशेष विकास निधीची स्थापना करण्यात आली होती. १९८०-८१ ते १९८३-८४ या काळात पुन्हा विशेष विकास निधी उभारण्यात आला होता (तक्ता क्रमांक ४.२).

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे एकूण निधी १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये सुमारे ६½ पटीने वाढले आहेत. संस्थेच्या पोटनियम ८०-८१ (१,२,५,७) अनुसार संस्थेच्या निव्वळ नफ्यातून विविध रक्कम वर्ग केली जाते. ती पुढीलप्रमाणे:-

| | | |
|---|---|---|
| राखीव निधी | .... | २५ टक्के |
| धर्मादाय निधी | .... | २ टक्के |
| संशयित बुडीत कर्ज निधी . | | ५ टक्के |
| इमारत निधी | .... | २ टक्के |
| नफा समानीकरण निधी.. | | $१\frac{१}{२}$ टक्के |

संस्थेच्या पोटनियमातील वरील तरतुदीमुळे राखीव आणि इतर निधी वाढण्यास मदत झाली आहे.

ब) संस्थेने उभारलेले कर्जाऊ वित्त:

अशाप्रकारच्या वित्तीय साधन सामुग्रीमध्ये संस्थेने सभासद व बिगर सभासद यांचेकडून स्वीकारलेल्या विविध स्वरूपाच्या ठेवी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व इतर संस्थाचेकडून घेतलेली कर्जे यांचा समावेश होतो. या वित्तावरती व्याज स्वरूपाने संस्थेला रक्कम खर्च करावी लागते.यासाठी अत्यंत योग्य व फायदेशीररीत्या भांडवलाचा वापर संस्थेला करावा लागतो. संस्थेची संपूर्ण व कायमची मालकी अशा वित्तावर नसते म्हणून या वित्तास उभारलेले कर्जाऊ वित्त असे म्हटले जाते. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेकडे असणा-या ठेवीमधील भांडवल आणि संस्थेने घेतलेली कर्जे याबातचे विश्लेषण पुढे केले आहे.

१) संस्थेकडे असणा-या ठेवी:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने सभासदाबरोबरच बिगर सभासदांचेकडूनही ठेवी स्वीकारलेल्या आहेत. १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये संस्थेने पुढील विविध स्वरूपाच्या ठेवी जमा केल्या आहेत:-

१) सभासद चालू ठेव

२) सभासद बचत ठेव

३) सभासद मुदत ठेव

४) सभासद पोष्ट बचत ठेव

५) बिगर सभासद ठेव

६) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने व्यापारी बँकेप्रमाणे सभासदांचेकडून चालू, बचत व मुदत ठेवी स्वीकारलेल्या आहेत. त्यामुळे सभासद आपल्या गरजेनुसार आपल्या खात्यामधील रकमेचा वापर करून शकतो. तसेच यामुळे संस्थेच्या ठेवी मोठया प्रमाणात वाढण्यास मदत झाली आहे. १९८०-८१ पासून चालू ठेवी बंद करण्यात आल्या आहेत. १९७३-७४ नंतर सभासदांच्या बचत ठेवीमध्ये वाढ झाली आहे. १९७३-७४ साली रु.४४७६० इतकी बचत ठेव होती. ही रक्कम वाढून १९८५-८६ साली रु.६१२४२३ इतकी झाली आहे. १९८०-८१ नंतर संस्थेने सभासदांचेकडून मुदत ठेव स्वीकारणे चालू केले आहे. अशा ठेवी १९८५-८६ पर्यंत तीन पटीने वाढल्या आहेत (तक्ता क्रमांक ४.३). सभासदांच्या पोस्टल बचत ठेवी १९७७-७८ पर्यंतच होत्या. बिगर सभासदांच्या ठेवी संस्थेकडे १९७९-८० पर्यंतच होत्या. गावामध्ये नागरी सहकारी पतसंस्थांची स्थापना झाल्यामुळे पुढील काळात बिगर सभासदांच्या ठेवी संस्थेकडे नाहीत.

संस्थेच्या कर्मचा-यांचा भविष्य निर्वाह निधी १९७९-८० पूर्वी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे ठेवण्यात आला होता. १९७९-८० नंतर असा भविष्य निर्वाह निधी संस्थेने स्वत:कडेच ठेवलेला आहे. त्यामुळे या रकमेचाही वापर संस्थेला ठेव स्वरूपाने करता येऊ लागला आहे. १९८५-८६

## तक्ता क्रमांक ४.३

### -: ठेवीचे वर्गीकरण :-

(रक्कम रूपये)

| वर्ष | समासद चालू ठेव | | समासद बचत ठेव | | समासद मुदत ठेव | | समासद पोस्टल बचत ठेव | | बिगर समासद ठेव | | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | | एकूण ठेव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम % | % | रक्कम | % |
| १९७०-७१ | ७७१४९ | ३३.५९ | १८५३० | ८.०६ | - | - | - | - | १३४०१७ | ५८.३४ | - | - | २२९६९६ | १००.०० |
| १९७१-७२ | ८७६०८ | १७.८० | ५७१६ | १.१६ | - | - | १०१४४३ | २०.६१ | २९७३२७ | ६०.४३ | - | - | ४९२०९४ | १००.०० |
| १९७२-७३ | १५५२९२९ | ८१.०६ | ५७१६ | ०.३० | - | - | १०१४४३ | ५.२९ | २५६८२२ | १३.४० | - | - | १९१६९१० | १००.०० |
| १९७३-७४ | १३००७१ | ८१.८२ | ४४७६० | ३.९४ | - | - | १०१४४३ | ८.९२ | ६०५०१ | ५.३२ | - | - | ११३६७७५ | १००.०० |
| १९७४-७५ | ९२३६१७ | ६४.१३ | १३३१५० | ९.२४ | - | - | २०१४४३ | १३.९९ | १८२०५१ | १२.६४ | - | - | १४४०२६१ | १००.०० |
| १९७५-७६ | ९१६१४० | ६६.९९ | १८८२०८ | १३.७६ | - | - | १०१४४३ | ७.४२ | १६१६९८ | ११.८३ | - | - | १३६७४८९ | १००.०० |
| १९७६-७७ | ५०६११ | १३.७७ | २११६४७ | ५७.५७ | - | - | ८८९३२ | २४.१९ | १६४१४ | ४.४७ | - | - | ३६७६१२ | १००.०० |
| १९७७-७८ | ५४३४४ | २०.६५ | १७५४९० | ६६.६९ | - | - | १८८२ | ०.७१ | ३१४१५ | ११.९४ | - | - | २६३१३२ | १००.०० |
| १९७८-७९ | २१७३९६ | ४७.३८ | २०१८२० | ४३.९८ | - | - | - | - | ३९६४३ | ८.६४ | - | - | ४५८८५८ | १००.०० |
| १९७९-८० | ४९८९५ | १५.१२ | २४९६९० | ७५.६५ | - | - | - | - | ११९३८ | ३.३७ | ११३२९ | ५.८६ | ३३००४२ | १००.०० |
| १९८०-८१ | - | - | ३९०३५५ | ९१.४७ | ६७७५ | १.५९ | - | - | - | - | २९६३४ | ६.९४ | ४२६७६४ | १००.०० |
| १९८१-८२ | - | - | ५५२९०० | ८१.२८ | ८५२९३ | १२.५४ | - | - | - | - | ४२०२५ | ६.१८ | ६८०२१८ | १००.०० |
| १९८२-८३ | - | - | ५९५०८४ | ९०.१५ | ११०२३ | १.६७ | - | - | - | - | ५३९६९ | ८.१८ | ६६००७६ | १००.०० |
| १९८३-८४ | - | - | ५९७९४९ | ८९.४८ | ८८१२ | १.३२ | - | - | - | - | ६१५२० | ९.२० | ६६८२८१ | १००.०० |
| १९८४-८५ | - | - | ५७७३५० | ७६.३२ | १०६०४६ | १४.०२ | - | - | - | - | ७३०५८ | ९.६६ | ७५६४५४ | १००.०० |
| १९८५-८६ | - | - | ६१२४२३ | ६३.९३ | २०६३५६ | २२.८९ | - | - | - | - | ८२८११ | ९.१८ | ९०१५९० | १००.०० |

साली भविष्य निर्वाह निधीची एकूण रक्कम रू.८२८११ इतकी आहे (तक्ता क्रमांक ४.३). संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये सभासदांच्या बचत ठेवीचे प्रमाण सर्वाधीक आहे. १९७२-८३ साली इतर वर्षाच्या तुलनेत ठेवीचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते (तक्ता क्रमांक ४.३). १९७६-७७ मध्ये एकूण ठेवीचे प्रमाण कमी झाले होते,परंतु नंतरचे काळात ते वाढते आहे.

२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व इतर संस्थाकडील कर्ज:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था,सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली, शाखा अंकलखोप या बँकेकडून कर्ज घेते. सभासदांना आवश्यक असणारी पीक कर्जे, ऊस कर्जे, द्राक्षबाग, कॅश क्रेडिट, मध्यम मुदती कर्जे, गोबर गॅस प्लॅन्ट, कुक्कुटपालन इत्यादि प्रकारची कर्जे संस्था घेते आणि सभासदांना त्याचा पुरवठा करते. १९७९-८० नंतरचे काळात मध्यम मुदती कर्जाचे प्रमाण वाढत आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेशिवाय राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळणारे गोडावून साठीचे कर्ज आणि महाराष्ट्र राज्य खादी-ग्रामोद्योग मंडळ यांचेकडून कांही वेळा संस्थेने कर्जे घेतलेली आहेत. तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून ठेव तारण कर्जही गरजेनुसार संस्थेने घेतले आहे. याबरोबरच गरज भासल्यास नजर गहाण व कॅश क्रेडिट स्वरूपाचे कर्जही संस्था घेते.

१९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये बँकेकडून घेतलेल्या कर्जाचे प्रमाण तीन पटीने वाढले आहे. १९७०-७१ साली रू.१९४३०९९ इतके कर्ज होते. तेच १९७४-७५ साली रू.२८०८९८६ इतके झाले आणि १९८५-८६ पर्यंत यामध्ये रू.५५४८०९६ इतकी वाढ झालेली आहे. ऊस क्षेत्राबरोबरच फळबागेचे वाढते प्रमाण आणि एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखालील योजना यामुळे बँकेकडील कर्जामध्ये वाढ दिसून येते.

## खेळते भांडवल

भागभांडवल, ठेवी, संस्थेचे राखीव व इतर निधी आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेसह इतर कर्ज या सर्व घटकांचे मिळून खेळते भांडवल तयार होते. कारण या सर्व घटकामधील भांडवलाचे सहाय्याने संस्था आपले आर्थिक व्यवहार पार पाडीत असते. खेळते भांडवल जितके जास्त असेल तितकी संस्थेला जास्त प्रगती करता येणे शक्य असते.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे खेळते भांडवल १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये वाढलेले आहे. १९७०-७१ साली रु.३६९३७२२ इतके होते ते १९८५-८६ साली रु.१०९१७३१४ पर्यंत वाढले आहे (तक्ता क्रमांक ४.४). संस्थेच्या खेळत्या भांडवलामधील सर्वाधिक हिस्सा बँकेकडील कर्जाचा आहे. १९७०-७१ साली त्याचे प्रमाण ५२.७५ टक्के इतके होते. १९७५-७६ ते १९७९-८० या काळात हे कमी झालेले दिसते. बाहेरील कर्ज उभारणी खालोखाल खेळत्या भांडवलातील दुसरा महत्वाचा घटक म्हणजे भागभांडवल हा होय. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे भागभांडवल १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये लक्षणीय प्रमाणात वाढल्यामुळे संस्थेच्या खेळत्या भांडवलात त्याला महत्व प्राप्त झाले आहे. १९७५-७६ साली भागभांडवल खेळत्या भांडवलाच्या ३८.६१ टक्के इतके होते. वरील दोन घटकांबरोबर संस्थेकडील ठेवी आणि संस्थेचे निधी यांचेही महत्व संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये आहे.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये संस्थेच्या मालकीच्या निधीचे प्रमाण १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये चढउताराने वाढत असल्याचे दिसून येते. १९७०-७१ साली ३६.९५ टक्के इतके तर १९७९-८० साली ५६.३६ टक्के आणि १९८५-८६ साली ३९.३७ टक्के असे संस्थेच्या मालकीच्या निधीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण आहे. १९७९-८० नंतर हे प्रमाण थोडे कमी होत आहे असे दिसते (तक्ता क्रमांक ४.५).

तक्ता क्रमांक ४.४

-: खेळत्या मांडवलाची रचना :-

| खेळत्या मांडवलाचे घटक | १९७०-७१ | १९७१-७२ | १९७२-७३ | १९७३-७४ | १९७४-७५ | १९७५-७६ | १९७६-७७ | १९७७-७८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) भागभांडवल | १११८६७५ (३०.२८) | १२७८१८५ (२८.६२) | १४०९८१५ (२२.९५) | १५४३१३५ (२७.८१) | १७४१०४० (२६.२९) | १८२३३७५ (३८.७०) | १७९७२८० (३४.६१) | १८७६७१५ (३४.३३) |
| २) राखीवनिधी | १३१०३० (३.५५) | १५२६९७ (३.४२) | १७२८३४ (२.८१) | १९७१७१ (३.५५) | २२१८११ (३.३५) | २६९५६७ (५.७२) | ३२४५३९ (६.२५) | ३५३१११ (६.४६) |
| ३) बुडीतकर्ज व इतर निधी. | ११५३५२ (३.१२) | १४७७१९ (३.३१) | १५६४४२ (२.५५) | १२४२६० (२.२३) | १३५५८५ (२.०५) | १७६५६२ (३.७५) | २२७२०२ (४.३८) | २१३७७० (३.९१) |
| ४) ठेवी | २२१६१६ (६.२२) | ४९२०९४ (११.०२) | १११६९१० (३१.२१) | ११३६७७५ (२०.४३) | १४४०२६१ (२१.७५) | १३६७४८९ (२९.०३) | ३६७६१२ (७.०८) | २६३१३२ (४.८१) |
| ५) कर्जउभारणी | ११४८४११ (५२.७५) | १८६९१७० (४१.८७) | २२४५३६५ (३६.५७) | २३६३३१७ (४२.५८) | २७६१४०६ (४१.८२) | ७२१५४९ (१५.४९) | ११३३५५० (३७.२४) | २४२८०१५ (४४.४३) |
| ६) इतर एकूण | ३५०४७० (४.०७) | ५२४९५८ (११.७६) | २३१११२ (३.९१) | १८५३६१ (३.३३) | ३१३७३६ (४.७४) | ३४४३६३ (७.३१) | ५४२३८२ (१०.४४) | ३३१००३ (६.०६) |
| ७) एकूण (१+२+३+४+५+६) | ३६९३७२२ (१००%) | ४४६५५२३ (१००%) | ६१४१२७८ (१००%) | ५५५००११ (१००%) | ६६२१८७१ (१००%) | ४७१०१०५ (१००%) | ५१५२५६५ (१००%) | ५४६५७४८ (१००%) |

| खेळत्या मांडवलाचे घटक | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) भागभांडवल | ११६८०४० (३५.५७) | २०३२३१० (४१.४०) | २१९४३१० (३०.९९) | २४०८३२० (२४.७०) | २५६७६०० (२७.३७) | २६७५०८० (३१.१६) | २८००८३० (२७.३९) | २९२७९०० (२६.८२) |
| २) राखीवनिधी | ४०५३१८ (७.३२) | ४४५६८० (९.०७) | ५११५२६ (७.३४) | ५८४६६३ (५.९९) | ६५२५४० (६.९५) | ७२२२८२ (८.४१) | ७६०९८८ (७.४४) | ८३५७०८ (७.५६) |
| ३) बुडीतकर्ज व इतर निधी. | २८२०५७ (५.१०) | २८८६६४ (५.८८) | ३५१८३२ (४.९७) | ४०८०६० (४.१८) | ४७२२०७ (५.०३) | ५३१७१५ (६.२०) | ४९४८९८ (४.८४) | ५३४६४९ (४.९०) |
| ४) ठेवी | ४५८८५८ (८.२९) | ३३००४२ (६.७१) | ४२६७६४ (६.०२) | ६८०२१८ (६.९८) | ६६००७६ (७.०४) | ६६८२८१ (७.७९) | ७५६४५४ (७.४०) | ९०१५१० (८.२६) |
| ५) कर्जउभारणी | २०४३१२५ (३६.९२) | १६१०१८८ (३२.८१) | ३१५४८५८ (४४.५६) | ५२१६१७७ (५४.२९) | ३८२७६११ (४०.८०) | ३४०६७७८ (३१.६८) | ३७४६२२० (३७.६२) | ५५४८०१६ (५०.८२) |
| ६) इतर एकूण | ३७६७५६ (६.८०) | २०१७११ (४.११) | ४३३८२६ (६.१२) | ३७६२६१ (३.८५) | १२०१६५८ (१२.८१) | ५८०३३१ (६.७६) | १५६५२०१ (१५.३१) | १६१३७१ (१.५५) |
| ७) एकूण (१+२+३+४+५+६) | ५५३४१५४ (१००%) | ४९०८६०३ (१००%) | ७०८१११६ (१००%) | १०७५३०७७ (१००%) | ९३८१७७२ (१००%) | ८५८४५४७ (१००%) | १०२२४५११ (१००%) | १०९१७३३४ (१००%) |

टीप : कंसातील आकडे एकूण खेळत्या मांडवलाशी संबंधित घटकाचे % प्रमाण दाखवितात.

## तक्ता क्रमांक ४.५

## -: प्रति सभासद मालकिचे निधी व खेळते मांडवल :-

| वर्ष | प्रतिसभासद मालकीचे निधी रू. | प्रतिसभासद खेळते मांडवल रू. | ३ चे ४ शी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९७०-७१ | १३०८.७७ | ३५४१.४४ | ३६.९५ |
| १९७१-७२ | १४८३.६४ | ४१९६.९२ | ३५.३५ |
| १९७२-७३ | १६०८.७७ | ५६८१.१० | २८.३१ |
| १९७३-७४ | १६६३.३० | ४९५१.०२ | ३३.५९ |
| १९७४-७५ | १७७०.८६ | ५५८८.०८ | ३१.६८ |
| १९७५-७६ | १८८३.४० | ३९०९.४६ | ४८.१७ |
| १९७६-७७ | १८५२.५४ | ४०९५.०८ | ४५.२३ |
| १९७७-७८ | १७९५.४४ | ४०१५.९७ | ४४.७० |
| १९७८-७९ | १९३१.२१ | ४०२४.८३ | ४७.९८ |
| १९७९-८० | १९८८.९६ | ३५२८.८३ | ५६.३६ |
| १९८०-८१ | २१६५.०४ | ५०००.७८ | ४३.२९ |
| १९८१-८२ | २३३९.०९ | ६७०८.१८ | ३४.८६ |
| १९८२-८३ | २४३२.३७ | ६१८०.३५ | ३९.३५ |
| १९८३-८४ | २५६८.०७ | ५६१०.८१ | ४५.७७ |
| १९८४-८५ | २६२९.१० | ६६२६.४३ | ३९.६७ |
| १९८५-८६ | २७५८.८२ | ७००७.२६ | ३९.३७ |
| वृध्दीदर टक्के | ५.०९ टक्के | ४.६५ टक्के | - |

## विभाग दुसरा

## अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचा कर्जपुरवठा

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप ही संस्था अल्पमुदती कर्ज पुरवठयाबरोबरच मध्यममुदती कर्जपुरवठाही करते. सर्वसाधारणपणे वेगवेगळया हेतूनुसार आणि कार्यासाठी अल्प व मध्यममुदती कर्जे ही संस्था सभासदांना पुरवित आहे.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये दिलेला एकूण कर्जपुरवठा रू.२२८२४७९ पासून रू.६६६९५०७ पर्यंत वाढलेला आहे. याच काळात एकूण कर्जपुरवठयाच्या वाढीचा निर्देशांक १०० ते २९२.२० पर्यंत वाढला आहे (तक्ता क्रमांक ४.६). १९७५-७६ यावर्षी वाढीचा निर्देशांक ९५.७८ असा आहे, व एकूण कर्जपुरवठा रू.२१८६१८४ इतका आहे. १९७०-७१ ते १९८५-८६ या संपूर्ण काळात फक्त १९७५-७६ याच वर्षी कर्जपुरवठयामध्ये तुलनात्मक मोठी घट दिसून येते. अन्यथा इतर सर्व वर्षांमध्ये एकूण कर्जपुरवठयात १९७०-७१ चे कर्जपुरवठयापेक्षा वाढ झालेली आहे. अर्थात १९८१ नंतरच्या काळात कर्जपुरवठयात सातत्याने मोठी वाढ झाल्याचे दिसते.

एकूण कर्जपुरवठयामध्ये अल्पमुदत कर्ज व मध्यम मुदत कर्जांचा समावेश होतो. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये पुरविलेल्या अल्पमुदती कर्जाचे बाबतीत कर्जरक्कम व वाढीचा निर्देशांक यामध्ये चढउतार दिसून येतो. १९७०-७१ ते १९७४-७५ या काळात रू.१८१९१०० पासून रू.३४१५८४४ पर्यंत कर्ज रकमेमध्ये वाढ झाली आहे, आणि वाढीचा निर्देशांक १८७.७७ पर्यंत वाढला आहे. १९७५-७६ यावर्षी अल्पमुदत

## तक्ता क्रमांक ४.६

## -: कर्जपुरवठयाची रचना :-

| वर्ष | अल्पमुदत कर्ज रक्कम रु. | अल्पमुदत कर्ज ए.कर्जाशी प्रमाण | मध्यममुदत कर्ज रक्कम रु. | मध्यममुदत कर्ज ए.कर्जाशी प्रमाण | एकूण कर्ज रु. |
|---|---|---|---|---|---|
| १९७०-७१ | १८१९१०० | ७९.७० | ४६३३७९ | २०.३० | २२८२४७९ |
| | (१००.००) | | (१००.००) | | (१००.००) |
| १९७१-७२ | २४९३५७४ | ८४.३३ | ४६३५९५ | १५.६७ | २९५६६१८ |
| | (१३७.०७) | | (१००.०५) | | (१२९.५३) |
| १९७२-७३ | २५६७९०६ | ८७.०७ | ४१०९४५ | १२.९३ | ३१७८८५१ |
| | (१५२.१६) | | (८८.६८) | | (१३९.२७) |
| १९७३-७४ | २६८७२९७ | ८७.३२ | ३९०८३३ | १२.६८ | ३०७७५३२ |
| | (१४७.७२) | | (८४.३३) | | (१३४.८३) |
| १९७४-७५ | ३४१५८४४ | ९२.८८ | २७०००५ | ७.१२ | ३६७७८३४ |
| | (१८७.७७) | | (५८.२७) | | (१६१.१३) |
| १९७५-७६ | १९९०७१५ | ९१.०६ | १९५४६८ | ८.९४ | २१८६१८४ |
| | (१०१४३) | | (४२.१८) | | (९५.७८) |
| १९७६-७७ | २४४६९११ | ९१.५४ | २२६२१३ | ८.४६ | २६७३२०५ |
| | (१३४.५१) | | (४८.८२) | | (११७.१२) |
| १९७७-७८ | ३१६४८८९ | ८९.७९ | ३६००३५ | १०.२१ | ३५२४९२५ |
| | (१७३.९८) | | (७७.७०) | | (१५४.४३) |
| १९७८-७९ | २८२७५६४ | ८६.९५ | ४२४४७६ | १३.०५ | ३२५२०४० |
| | (१५५.४४) | | (९१.६०) | | (१४२.४८) |
| १९७९-८० | २२२१२५७ | ८७.७८ | ३०९२०७ | १२.२२ | २५३०४६६ |
| | (१२२.११) | | (६६.७३) | | (११०.८६) |
| १९८०-८१ | ३५५८४३८ | ८५.०७ | ६४२०५९ | १४.९३ | ४३००४९८ |
| | (२०१.११) | | (१३८.५६) | | (१८८.४१) |
| १९८१-८२ | ५०३०९३३ | ८४.८५ | ८९७९६० | १५.१५ | ५९२८८९३ |
| | (२७६.५६) | | (१९३.७८) | | (२५९.७५) |
| १९८२-८३ | ४२९४८६६ | ८६.०५ | ६९६४१७ | १३.९५ | ४९९१२८३ |
| | (२३६.०९ | | (१५०.२९) | | (२१८.६८) |
| १९८३-८४ | ४०३९१४८ | ८६.०३ | ६५५८४२ | १३.९७ | ४६९४९९१ |
| | (२२२.०४) | | (१४१.५३) | | (२०५.६९) |
| १९८४-८५ | ३८२८८९५ | ७४.१३ | १३३६१०३ | २५.८७ | ५१६४९९९ |
| | (२१०.४८) | | (२८८.३४) | | (२२६.२८) |
| १९८५-८६ | ३६४९६६० | ५४.७२ | ३०१९८४७ | ४५.२८ | ६६६९५०७ |
| | (२००.६३) | | (६५१.७०) | | (२९२.२०) |

कंसातील आकडे वाढीचा निर्देशांक दाखवितात.

कर्जपुरवठयात घट झाली आहे. १९८२-८३ ते १९८५-८६ पर्यंत सलग दरवर्षी अल्प मुदत कर्जपुरवठयात घट झाली आहे. या काळात रु.५०३०९३३ पासून रु.३४४९६६० पर्यंत कर्जपुरवठा कमी झाला आहे आणि वाढीचा निर्देशांक २७६.५६ वरून २००.६३ असा झाला आहे. अल्पमुदती कर्जपुरवठयाचे १९७०-७१ ते १९८५-८६ या संपूर्ण काळामध्ये एकूण कर्ज पुरवठयाशी शेकडा प्रमाण सरासरी ८७ टक्के इतके आहे. १९८५-८६ यावर्षी हे प्रमाण ५४.७२ टक्के असे आहे (तक्ताक्रमांक ४.६).

मध्यम मुदती कर्जपुरवठयामध्ये १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये रु.४६३३७९ पासून रु.३०१९८४७ पर्यंत वाढ झाली आहे. कर्जपुरवठयाच्या वाढीचा निर्देशांक १०० पासून ६५१.७० पर्यंत वाढला आहे. १९७०-७१ ते १९७५-७६ या काळात मध्यम मुदती कर्जपुरवठा सतत कमी झाला आहे. परंतु १९७६-७७ ते १९८५-८६ या काळात मात्र प्रतिवर्षी मध्यम मुदत कर्जपुरवठा सतत वाढलेला आहे (तक्ता क्रमांक ४.६). १९७०-७१ ते १९८५-८६ या काळात मध्यम मुदती कर्जपुरवठयात सुमारे ६½ पटीने वाढ झाली, आणि १९८५-८६ यावर्षी ही वाढ पूर्वीच्या वर्षाच्या मानाने २.५ पटीपेक्षा अधिक झाली. वाढीचा निर्देशांक १९८४-८५ यावर्षी २८८.३४ होता तो १९८५-८६ ला ६५१.७० पर्यंत वाढला. संपूर्ण पाहणी काळात मध्यम मुदती कर्जपुरवठयाचे एकूण कर्जपुरवठयाशी शेकडा प्रमाण सरासरी १५ टक्के इतके आहे. तथापि १९७८ पासून पुढे हे प्रमाण वाढत जाऊन १९८५-८६ मध्ये ४५.२८ टक्के इतके झाले आणि हे इतर सर्व वर्षाच्या तुलनेत जास्तीतजास्त आहे (तक्ता क्रमांक ४.६)

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप या संस्थेने पुरविलेल्या एकूण कर्जाच्या रचनेवरून खालील वैशिष्टये दिसून येतात.

१) एकूण कर्जपुरवठयामध्ये अल्पमुदती कर्जरकमेचा हिस्सा नेहमीच मोठया प्रमाणात आहे, आणि मध्यममुदती कर्जरकमेचा हिस्सा सुरूवातीस फारच कमी होता तो नंतरच्या काळात कांहीसा वाढला आहे (तक्ता क्रमांक ४.६).

२) १९८३-८४ ते १९८५-८६ या तीन वर्षांच्या काळामध्ये अल्पमुदत कर्जपुरवठयाचे एकूण कर्जपुरवठयाशी असणारे प्रमाण सतत वेगाने (८६.०३ टक्के पासून ५४.७२ टक्के पर्यंत ) कमी झाले आहे. याउलट याच काळात मध्यममुदत कर्जपुरवठयाचे एकूण कर्जपुरवठयाशी असणारे प्रमाण सतत )(१३.९७ टक्के पासून ४५.२८ टक्के पर्यंत) वाढले आहे (तक्ता क्रमांक ४.६).

३) पाहणीचे संपूर्ण काळामध्ये अल्पमुदत कर्जपुरवठयाचे एकूण कर्जपुरवठयाशी असणारे प्रमाण ५४.७२ टक्के आणि ९२.८८ टक्के या मर्यादेत आहे आणि मध्यम मुदत कर्जाचे प्रमाण ७.१२ टक्के ते ४५.२८ टक्के या मर्यादेत आहे.

अल्पमुदती कर्जपुरवठा - अधिक विवेचन:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था सभासदांना अल्पमुदतीचा कर्जपुरवठा खालील अनेक कारणांसाठी करते:-

१) शेतीची हंगामी कामे (मशागत)

२) शेती उपयुक्त वस्तू खरेदी करणे

३) पीकांची विक्री करणे

४) शेत उत्पादनावर प्रक्रिया करणे

५) औद्योगिक हेतू (कारागीर)

६) उपभोग्य कर्ज

७) शेतीच्या पाणीपुरवठयाचे बिल भागविणे ( माहे अगर विद्युत पंपाचे लाईट बिल).

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

<u>अल्पमुदत कर्जपुरवठयाचे स्वरूप:</u>

अल्पमुदती कर्जपुरवठा पुढील दोन प्रकारानी दिला जातो:-

अ) <u>रोख स्वरूपात</u>: शेतीची हंगामी कामे, मशागत, यासाठीचा खर्च भागविण्यासाठी रोख स्वरूपात कर्ज दिले जाते.

ब) <u>मालस्वरूपात कर्ज</u>: शेतीला आवश्यक असणारी खते, बी-बियाणे इत्यादि वस्तूमाल पुरविला जातो.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने १९७६-७७ ते १९८५-८६ या काळामध्ये अल्पमुदत कर्जाचे वितरण रोख आणि वस्तूस्वरूपात कशाप्रकारे केले आहे ते तक्ता क्रमांक ४.७ मध्ये दाखविले आहे. १९७६-७७ या वर्षात संस्थेने रू.१७६७६०९ रोख स्वरूपात आणि रू.६७९३८२ वस्तू स्वरूपात असे एकूण रू.२४४६९९१ अल्पमुदत कर्ज पुरविले आहे. तक्ता क्रमांक ४.७ वरून असे लक्षात येते की १९७६-७७ यावर्षी एकूण अल्पमुदत कर्जापैकी ७२.२४ टक्के कर्ज रोख स्वरूपात तर २७.७६ टक्के कर्ज मालस्वरूपात दिले होते.

एकूण अल्पमुदत कर्जपुरवठयामधील रोखस्वरूपी दिलेल्या कर्जाचे प्रमाण १९७६-७७ ते १९८५-८६ या काळात ७२.२४ टक्के पासून ५३.३० टक्के पर्यंत कमी होत आलेले आहे. १९७८-७९ ते १९८१-८२ या काळात कांही प्रमाणात अशा कर्जाचे प्रमाण वाढलेले आहे (तक्ता क्रमांक ४.७). याउलट एकूण अल्पमुदत कर्जपुरवठयातील वस्तूस्वरूपाने दिलेल्या कर्जाचे प्रमाण १९७६-७७ ते १९८५-८६ या एकूण काळात २७.७६ टक्के पासून ४६.७० टक्के पर्यंत वाढलेले आहे. १९७८-७९ ते १९८१-८२ या काळात ६३.१५ टक्के ते ४३.८२ टक्के पर्यंत वस्तूस्वरूपी कर्जाचे प्रमाण कमी झालेले आहे.

## तक्ता क्रमांक ४.७

### अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या अल्पमुदती कर्जपुरवठयातील घटक

(रक्कम रूपयात)

| वर्ष | रोख कर्ज | वस्तूरूप कर्ज | एकूण |
|---|---|---|---|
| १९७६-७७ | १७६७६०९ | ६७९३८२ | २४४६९९१ |
| | (७२.२४) | (२७.७६) | (१००.००) |
| १९७७-७८ | २३५८६१५ | ८०६२७४ | ३१६४८८९ |
| | (७४.५२) | (२५.४८) | (१००.००) |
| १९७८-७९ | १०४११२९ | १७८५६३५ | २८२७५६४ |
| | (३६.८५) | (६३.१५) | (१००.००) |
| १९७९-८० | ८६०५५५ | १३६०७०२ | २२२१२५७ |
| | (३८.७४) | (६१.२६) | (१००.००) |
| १९८०-८१ | १७०६२८५ | १९५२१५३ | ३६५८४३८ |
| | (४६.६४) | (५३.३६) | (१००.००) |
| १९८१-८२ | २८२६४०८ | २२०४५२५ | ५०३०९३३ |
| | (५६.१८) | (४३.८२) | (१००.००) |
| १९८२-८३ | २१५३३२६ | २१४१५४० | ४२९४८६६ |
| | (५०.१४) | (४९.८६) | (१००.००) |
| १९८३-८४ | १२३६१८५ | २८०२९६३ | ४०३९१४८ |
| | (३०.६१) | (६९.३९) | (१००.००) |
| १९८४-८५ | १६७६५८३ | २१५२३१२ | ३८२८८९५ |
| | (४३.७९) | (५६.२१) | (१००.००) |
| १९८५-८६ | १९४५२५० | १७०४४१० | ३६४९६६० |
| | (५३.३०) | (४६.७०) | (१००.००) |

(कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात)

पीकानुसार अल्पमुदत कर्जपुरवठा:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने ऊस, ज्वारी, गहू, तेलबिया (मूईमुग), कापूस, कडधान्ये अशा अनेक पीकासाठी कर्जपुरवठा केला आहे. यापैकी उसासाठी दिलेल्या कर्जाचे प्रमाण सर्वोच्च आहे. १९७६-७७ यावर्षी एकूण पीकांना दिलेल्या अल्पमुदती कर्जापैकी ९०.८८ टक्के इतके कर्ज फक्त ऊसपीकासाठी दिले गेले आहे. १९७७-७८ यावर्षी हेच प्रमाण ९१.६१ टक्के इतके आहे. १९७७-७८ ते १९८५-८६ या काळात उसासाठी पुरविलेल्या कर्जाचे प्रमाण ७९.७० टक्के पर्यंत कमी झाले आहे. १९८४-८५ या वर्षात मात्र हे प्रमाण ८१.२४ टक्के आहे आणि कर्ज रक्कम रु.३११०५९० अशी आहे (तक्ता क्रमांक ४.८).

१९७६-७७ ते १९८५-८६ या काळात संस्थेने ज्वारी पीकांसाठी पुरविलेल्या कर्जाचे एकूण अल्पमुदत कर्जाशी असणारे प्रमाण मात्र सतत कमी जास्त झाले आहे. १९७६-७७ यावर्षी ७.६३ टक्के व रक्कम रु.१८६६६० अशी होती. तेच १९७८-७९ यावर्षी प्रमाण १.६० टक्के व कर्जरक्कम रु.४५१८० इतकी कमी झाली आहे. १९८१-८२ यावर्षी रु.७५२०५३ इतके कर्ज ज्वारीसाठी दिले होते. त्याचे एकूण अल्पमुदत कर्जाशी प्रमाण १४.९५ टक्के होते (तक्ता क्रमांक ४.८)

गहू या पीकांसाठी दिलेलं कर्ज १९७६-७७ ते १९८५-८६ या पाहणी काळात फक्त तीन वर्षाच दिलेले दिसून येते. १९७७-७८ यावर्षी फक्त रु.९०० इतकीच कर्जरक्कम होती. १९७९-८० यावर्षी कर्जरक्कम रु.१३०० व एकूण अल्पमुदत कर्जाशी प्रमाण ०.०६ टक्के असे होते. १९८१-८२ या वर्षात कर्जरक्कम रु.६०१६०० व प्रमाण ११.९६ टक्के असे आहे. मूईमुग पीकांसाठी १९७९-८० पर्यंतच कर्ज दिल्याचे दिसून येते. यामध्येही या पीकांसाठीच्या

तक्ता क्रमांक ४.८

## -: अल्पमुदत कर्जाचे पिकवार वितरण ( १९७६-७७ ते १९८५-८६) :-

(रक्कम रुपयात)

| तपशील | १९७६-७७<br>रक्कम | १९७७-७८<br>रक्कम | १९७८-७९<br>रक्कम | १९७९-८०<br>रक्कम | १९८०-८१<br>रक्कम | १९८१-८२<br>रक्कम | १९८२-८३<br>रक्कम | १९८३-८४<br>रक्कम | १९८४-८५<br>रक्कम | १९८५-८६<br>रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) ऊस | २२२३८८१<br>(९०.८८) | २८९९५०१<br>(९१.६१) | २२२७०६८<br>(७८.७६) | १९२८४९८<br>(८६.८२) | २७१७४४५<br>(७४.२८) | ३६७७२८०<br>(७३.०९) | ३०५७०७९<br>(७१.१८) | २७३२५२५<br>(६७.६५) | ३११०५९०<br>(८१.२४) | २९०८८२०<br>(७९.७०) |
| २) ज्वारी | १८६६६० <br>(७.६३) | १४९३३० <br>(४.७२) | ४५१८० <br>(१.६०) | ४७२५५ <br>(२.१३) | ४२८१०८ <br>(११.७०) | ७५२०५३ <br>(१४.९५) | ११४२३५ <br>(२.६६) | ३४५६०३ <br>(८.५६) | १४५७५० <br>(३.८१) | १६५२३५ <br>(४.५३) |
| ३) गहू | - | ९००<br>(०.०३) | - | १३००<br>(०.०६) | - | ६०१६००<br>(११.९६) | - | - | - | - |
| ४) भूईमूग | ३६४५०<br>(१.४९) | ९६७०<br>(०.३०) | ६७५०<br>(०.२४) | ५०००<br>(०.२३) | - | - | - | - | - | - |
| ५) कापूस | - | १५९९४<br>(०.५१) | - | १२५००<br>(०.५६) | - | - | - | - | - | - |
| ६) कडधान्ये | - | - | - | - | - | - | १८५८४०<br>(४.३३) | - | - | - |
| ७) इतर सर्व | - | ८९४९४<br>(२.८३) | ५४८५६६<br>(१९.४०) | २२६७०४<br>(१०.२०) | ५१२८८५<br>(१४.०२) | - | ९३७७१२<br>(२१.८३ | ९६१०२०<br>(२३.७९) | ५७२५५५<br>(१४.९५) | ५७५६०५<br>(१५.७७) |
| एकूण | २४४६९९९<br>(१००) | ३१६४८८९<br>(१००) | २८२७५६४<br>(१००) | २२२१२५७<br>(१००) | ३६५८४३८<br>(१००) | ५०३०९३३<br>(१००) | ४२९४८६६<br>(१००) | ४०३९१४८<br>(१००) | ३८२८८९५<br>(१००) | ३६४९६६०<br>(१००) |

( कंसातील आंकडे शेकडा प्रमाण दर्शवितात)

कर्जाचे प्रमाण १.४९ टक्के पासून ०.२३ टक्के पर्यंत कमी झाले आहे. १९८०-८१ ते १९८५-८६ या काळात मुईमुगासाठी कर्जपुरवठा केलेला नाही (तक्ता क्रमांक ४.८).

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने एकूण पाहणी काळात कापूस पीकासाठी १९७७-७८ व १९७९-८० या वर्षांचे फक्त कर्जपुरवठा केलेला आहे. इतर वर्षामध्ये असा कर्जपुरवठा केलेला नाही. एकूण अल्पमुदत कर्जातील याचे प्रमाणही फारच अल्प आहे. १९७७-७८ मध्ये हे प्रमाण ०.५१ टक्के व १९७९-८० मध्ये ०.५६ टक्के असे होते. कडधान्यांच्या पीकांसाठी १९८२-८३ यावर्षी कर्ज दिलेले आहे. त्याचे एकूण पीक कर्जाशी प्रमाण ४.३३ टक्के आहे व कर्जरक्कम रु.१८५८४० अशी आहे. इतर सर्व कर्जामध्ये भात, सोयाबीन, वाटाणा इत्यादि पीक तसेच द्राक्षाबाग कॅश क्रेडिटसह इतर कर्जाचा समावेश आहे (तक्ता क्रमांक ४.८).

मध्यममुदती कर्जपुरवठा:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप यासंस्थेने १९७०-७१ ते १९८५-८६ या पाहणी काळात विविध प्रकारची मध्यम मुदत कर्जे समासदांना दिलेली आहेत. मध्यम मुदतीची कर्जे प्रामुख्याने पुढील कारणासाठी दिली जातात:-

१) नवीन फळबाग व जुन्या बागेच्या दुरूस्तीसाठी (द्राक्षे, केळी, पानमळे, डाळींबी, गुलाब इत्यादि).

२) शेती उपयुक्त जोडधंदा (प्रामुख्याने कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय इत्यादि).

३) जुन्या कर्जाचे पुनर्वसन.

४) रूपांतरीत कर्ज.

५) गोबर गॅस सयंत्र.

६) इतर शेती उपयुक्त साधनसामग्री खरेदी करणे (मोटारपंप सेट, मळणीयंत्र इत्यादि).

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने वरील हेतूनुसार मध्यम मुदती कर्जपुरवठा १९७०-७१ यावर्षी एकूण कर्जपुरवठयाच्या फक्त २०.३० टक्के केला होता. १९८५-८६ पर्यंत हे प्रमाण ४५.२८ टक्के पर्यंत वाढले आहे. सदर काळात मध्यम मुदत कर्जाची रक्कम रू.४६३३७९ पासून रू.३०१९८४७ पर्यंत वाढली आहे. अशात-हेने मध्यम मुदत कर्जपुरवठा मोठयाप्रमाणात वाढला आहे.

## मध्यममुदत कर्जाचे हेतूनुसार विभाजन:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने मध्यम मुदत कर्जाचे वितरण विविध हेतूनुसार )१९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये) कशाप्रकारे केले आहे याचे स्पष्टीकरण तक्ता क्रमांक ४.९ मध्ये केले आहे. विविध हेतूनुसार संस्थेच्या मध्यममुदती कर्जपुरवठयामध्ये खालीलप्रकारे बदल दिसून येतो.

१) १९७०-७१ ते १९८५-८६ या पाहणी काळात फळबागांसाठी दिलेल्या कर्जाचा हिस्सा दुस-या क्रमांकावर आहे. १९७०-७१ ते १९८०-८१ या काळात रू.९४२०० पासून रू.१०१२७६ पर्यंत अशी या कर्जरकमेची वाढ झाली. एकूण मध्यममुदत कर्जापैकी या कर्जाचे प्रमाण २०.३३ टक्के पासून ३२.७५ टक्केपर्यंत वाढले. १९८०-८१ ते १९८५-८६ या काळात हे प्रमाण २२.७४ टक्के पासून ७.०१ टक्के इतके कमी झाले आहे (तक्ता क्रमांक ४.९).

२) शेतीस उपयुक्त जोडधंदा निर्माण करण्याचे हेतूने दिलेल्या कर्जाचे एकूण मध्यममुदत कर्जपुरवठयाशी असलेले प्रमाण १९७०-७१ ते १९७६-७७ या काळात १५.६८ टक्के पासून ४०.७६ टक्के पर्यंत वाढले आहे. याच काळात अशा कर्जरकमेत रू.७२६५० पासून रू.९२१९८ पर्यंत वाढ झाली आहे. १९७७-७८ ते १९८४-८५ या काळात हे प्रमाण व कर्ज रक्कम सतत प्रतिवर्षी कमी होत गेली आहे. अशा कर्जाचे एकूण मध्यम मुदत कर्जाशी असणारे प्रमाण २०.०५ टक्के पासून ०.०५ टक्के पर्यंत कमी झाले आहे. १९८५-८६ या वर्षी मात्र या प्रकारचे कर्जाचे एकूण मध्यम मुदत कर्जाशी प्रमाण ५७.३१ टक्के आहे आणि कर्ज रक्कम रू.१७३०६७४ इतकी आहे. या एकाच वर्षी असे कर्ज वाढण्याचे कारण म्हणजे संस्थेच्या अनेक सभासदांनी कुक्कुटपालन व्यवसायासाठी मोठया प्रमाणात कर्ज घेतले आहे.

३) पुनर्वसन हेतूने दिलेल्या कर्जाची रक्कम १९७४-७५ ते १९८५-८६ या काळात रू.५१८१५ पासून रू.६२४९ पर्यंत कमी झाली व तिचे एकूण मध्यम मुदत कर्जाशी असणारे प्रमाण १९.२९ टक्के पासून ०.२१ टक्के पर्यंत कमी झाले. एकूण पाहणी काळात पुनर्वसन कारणासाठीचे कर्ज झपाटयाने कमी होत असल्याचे दिसून येते.

४) रूपांतरीत कर्जासाठी १९७४ ते १९८० या काळात कर्ज दिलेले दिसून येते. तथापि अशा कर्जाची रक्कम रू.६९२३ पासून रू.४६६ पर्यंत कमी झाली आहे. ही घट वाढत्या दराने झालेली दिसते. एकूण मध्यम मुदत कर्जाशी अशा कर्जाचे प्रमाण १.७८ टक्के ते ०.१५ टक्के इतके कमी झाले आहे. १९८०-८१ ते १९८२-८३ या तीन वर्षाचे काळात अशाप्रकारचे कर्ज दिले गेलेले नाही. १९८३-८४ ते १९८५-८६ या काळात कर्ज रक्कम रू.५४६०७ पासून रू.२७४०५ पर्यंत कमी झाली आहे (तक्ता क्रमांक ४.९).

तक्ता क्रमाक ४.९

## -: मध्यम मुदत कर्ज हेतूप्रमाणे वर्गीकरण :-

| कर्जाचा हेतू | १९७०-७१ | १९७१-७२ | १९७२-७३ | १९७३-७४ | १९७४-७५ | १९७५-७६ | १९७६-७७ | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) फळबाग (द्राक्षे, केळी पानमळे). | ९४२०० (२०.३३) | ९२१२६ (१९.८७) | ९५९५३ (२३.३५) | ९०८६९ (२३.२६) | ६८५२२ (२५.३५) | ५२२५८ (२६.७३) | ६४७१७ (२८.६१) | १०२३४३ (२८.४३) | ११४८२३ (२७.०५) | १०१२७६ (३२.७५) | १४६०११ (२२.७४) | ८३८६२ (९.३५) | १६५६० (२.३८) | ३९७६३ (६.०६) | ९६६४७ (७.२४) | २११८७९ (७.०१) |
| २) जोडधंदा, (कुक्कुटपालन, दूग्धव्यवसाय). | ७२६५० (१५.६८) | ९७६१६ (२०.०६) | ८७४१२ (२१.२७) | ९५३४७ (२४.३८) | ८२७५१ (३०.६७) | ६५१०८ (३३.३१) | ९२११८ (४०.७६) | ७२१८८ (२०.०५) | ३४७९२ (८.१९) | २१४७० (६.९५) | ८५७६ (१.३४) | ८२३१ (०.९१) | ८२३१ (१.१८) | १३९४ (०.२१) | ६६६ (०.०५) | १७३०६७४ (५७.३१) |
| ३) पुनर्वसन | - | - | ७१९५१ (१७.५०) | ५८६६६ (१५.०२) | ५१८१५ (१९.२९) | ३७४७२ (१९.१७) | ३६३९० (१६.०९) | ३४२२० (९.५०) | २७२३९ (६.४२) | २६५७१ (८.५९) | १७४२४ (२.७१) | १३०९६ (१.४६) | १३०८९ (१.८८) | ८१७८ (१.२५) | ६६९५ (०.५०) | ६२४९ (०.२१) |
| ४) रुपातरीत. | - | - | - | ६९२३ (१.७८) | ५२०० (१.९४) | ५१३४ (२.६३) | १३५७ (०.६०) | ३८५ (०.११) | ४६६ (०.११) | ४६६ (०.१५) | - | - | - | ५४६०७ (८.३३) | ३६४०५ (२.७२) | २७४०५ (०.९१) |
| ५) गोबरगॅस प्लॅन्ट. | ६४३०८ (१३.८७) | ६०१५६ (१२.९८) | ४८२८८ (११.७६) | ३७०५६ (९.४९) | ६८१७ (२.५२) | २८२७ (१.४५) | ९५९ (०.४२) | ६३० (०.१७) | ६३० (०.१५) | - | - | - | - | - | उ.ना. | उ.ना. |
| ६) इतरशेती कार्ये. | २३२२२२ (५०.१२) | २१३६९७ (४६.०९) | १०७३४१ (२६.१२) | १०१७२७ (२६.०५) | ५४६३२ (२०.२३) | ३२६६९ (१६.७१) | ३०५९२ (१३.५२) | ५०२६८ (४१.७४) | २४६५२४ (५८.०८) | १५९४२४ (५१.५६) | ४७००४९ (७३.२१) | ७९२७७२ (८८.२८) | ६५८५३७ (९४.५६) | ५५१९०० (८४.१५) | ११९५६९१ (८९.४९) | १०४३६४० (३४.५६) |
| एकूण (१+२+३+४+५+६) | ४६३३७९ (१००%) | ४६३५९५ (१००%) | ४१०९४५ (१००%) | ३९०८३३ (१००%) | २७०००५ (१००%) | १९५४६८ (१००%) | २२६२१३ (१००%) | ३६००३५ (१००%) | ४२४४७६ (१००%) | ३०९२०७ (१००%) | ६४२०५९ (१००%) | ८९७९६० (१००%) | ६९६४१७ (१००%) | ६५५८४२ (१००%) | १३३६१०३ (१००%) | ३०१९८४७ (१००%) |

(कंसातील आकडे शेकडा प्रमाण दाखवितात)

५) गोबर गॅस संयंत्र उभारणीसाठी दिलेल्या कर्जाचे एकूण मध्यम मुदत कर्जाशी प्रमाण १९७०-७१ मध्ये १३.८७ इतके होते ते १९७८-७९ पर्यंत ०.१५ टक्के इतके कमी झाले आहे. या कारणासाठी देण्यात आलेले कर्ज १९७०-७१ मध्ये रू.६४३०८ होते ते १९७८-७९ मध्ये रू.६३० पर्यंत कमी झाले. १९८० पासून पुढील काळात असे कर्ज दिलेले दिसत नाही.

६) शेतीच्या इतर कारणांसाठी दिलेल्या मध्यम मुदती कर्जपुरवठयामध्ये १९७०-७१ ते १९८५-८६ या काळात सतत चढउतार दिसून येतात. १९७०-७१ ते १९७५-७६ या काळात हे प्रमाण ५०.१२ टक्के वरून १३.५२ टक्के इतके कमी झाले आहे. तर कर्ज रक्कम रू.२३२२२२ पासून रू.३०५९२ पर्यंत घटली आहे. नंतर मात्र १९८२-८३ यावर्षी अशा कर्जाचे प्रमाण ९४.५६ इतके मोठे होते व पुन्हा हे प्रमाण ३४.५६ टक्के इतके खाली आले.

## विभाग तिसरा

### अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेची थकबाकी

सभासदांना दिलेल्या कर्ज रकमेची मुदतीमध्ये परतफेड झाली नाही, किंवा कर्ज रकमेपैकी कांही रकमेची परतफेड झाली नाही अशा कर्जरकमेस थकबाकी असे म्हणतात. सहकारी पतसंस्थेची थकबाकी कमी असणे हे त्या संस्थेच्या प्रगतीच्यादृष्टीने योग्य असते व संस्थेच्या तसेच कर्जदारांच्या कार्यक्षम व्यवहाराचे द्योतक असते. संस्थेने सभासदांना पुरविलेल्या कर्ज रकमेच्या वापरावर योग्य नियंत्रण ठेवले, कर्जवसुलीची योग्य यंत्रणा राबविली व त्याविषयक योग्य धोरण स्वीकारले तर थकबाकीचे प्रमाण कमीतकमी राहू शकते. कर्जाचा अनुत्पादक कार्यासाठी वापर झाल्यास कर्जवसुली करणे अडचणीचे होते. यासाठी संस्थेने दक्ष राहणे आवश्यक असते.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या थकबाकीचे प्रमाण आणि त्यामध्ये होणारा बदल याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे. त्यासाठी१९७०-७१ ते १९८५-८६ या काळाचा संदर्भ घेतला आहे.

थकबाकीचे एकूण कर्जपुरवठयाशी शेकडा प्रमाण:

१९७०-७१ ते १९८५-८६ या एकूण संदर्भ काळामध्ये थकबाकीचे एकूण कर्जपुरवठयाशी (अल्प व मध्यम मुदत कर्ज) असणारे प्रमाण सरासरी १२ टक्के इतके आहे. १९७०-७१ ते १९७४-७५ या काळात थकबाकीचे कर्ज पुरवठयाशी असणारे शेकडा प्रमाण दरवर्षी १० टक्के पेक्षा कमी आहे. १९७२-७३ यावर्षी इतर वर्षांचे तुलनेत थकबाकीचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे २.०५ टक्के होते. याउलट १९७५-७६ यावर्षी हे प्रमाण २२.९९ टक्के होते. ते इतर वर्षांचे तुलनेत सर्वाधिक होते. १९८३-८४ नंतर थकबाकीचे असे प्रमाण कमी होत असल्याचे दिसते (तक्ता क्रमांक ४.१०). थकबाकीची रक्कम १९७२-७३ यावर्षी रु.६५३५९ होती. १९७५-७६ साली हीच रक्कम रु.५६८३२६ इतकी वाढली आहे. पुढील काळात थकबाकीची रक्कम कमी होत असल्याचे दिसून येते. १९८५-८६ पर्यंत रु.१६१५०० अशी थकबाकी कमी झाली आहे (तक्ता क्रमांक ४.१०).

थकबाकीतील बदलाची दिशा:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या थकबाकीमध्ये १९७०-७१ ते १९८५-८६ या काळात चढउताराचे बदल झाले आहेत. एकूण थकबाकी (अल्प व मध्यम मुदत कर्ज) वाढीचा निर्देशांक १९७०-७१ ते १९७५-७६ या काळात १०० वरून २६६.२८ पर्यंत वाढला आहे. पुढील काळात १९८१-८२ पर्यंत हा निर्देशांक ८०.६६ पर्यंत कमी झाला आहे. १९८१-८२ यावर्षी

## तक्ता क्रमांक ४.१०

## : थकबाकीचे कर्जपुरवठयाशी प्रमाण :

| वर्ष | एकूण कर्जे रु | एकूण थकबाकी रु | थकबाकीचे कर्जपुरवठयाशी % प्रमाण |
|---|---|---|---|
| १९७०-७१ | २२८२४७९ | २१३४३० | ९.३५ |
| १९७१-७२ | २९५६६१८ | २८२१७८ | ९.५४ |
| १९७२-७३ | ३१७८८५१ | ६५३५९ | २.०५ |
| १९७३-७४ | ३०७७५३२ | २४२३५८ | ७.८७ |
| १९७४-७५ | ३६७७८३४ | ३२६२०५ | ८.८६ |
| १९७५-७६ | २१८६१८४ | ५६८३२६ | २५.९९ |
| १९७६-७७ | २६७३२०५ | ४०८५०० | १५.२८ |
| १९७७-७८ | ३५२४९२५ | ३३३४०० | ९.४५ |
| १९७८-७९ | ३२५२०४० | ३१५२६० | ९.६९ |
| १९७९-८० | २५३०४६६ | २९८८३१ | ११.८० |
| १९८०-८१ | ४३००४९८ | १९८१३० | ४.६० |
| १९८१-८२ | ५९२८८९३ | १७२१५० | २.९० |
| १९८२-८३ | ४९९१२८३ | ८०२२१८ | १६.०७ |
| १९८३-८४ | ४६९४९११ | ६५५७०० | १३.९६ |
| १९८४-८५ | ५१६४९९९ | ३४९३०० | ६.७६ |
| १९८५-८६ | ६६६९५०७ | १६१५०० | २.४२ |

## तक्ता क्रमांक ४.११

## : थकबाकी बदलाची दिशा :

| वर्ष | अल्पमुदत कर्ज थकबाकी | | मध्यममुदत कर्ज थकबाकी | | एकूण थकबाकी रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| | रक्कम रू. | टक्केवारी | रक्कम रू. | टक्केवारी | |
| १९७०-७१ | - | - | - | - | २१३४३० (१००.००) |
| १९७१-७२ | २०९७२० | ७४.३२ | ७२४५८ | २५.६८ | २८२१७८ (१३२.२१) |
| १९७२-७३ | - | - | - | - | ६५३५१ (३०.६२) |
| १९७३-७४ | २०११०२ | ८३.३१ | ४०४५६ | १६.६९ | २४२३५८ (११३.५५) |
| १९७४-७५ | २६०८९० | ७९.९८ | ६५३१५ | २०.०२ | ३२६२०५ (१५२.८४) |
| १९७५-७६ | ४८३९७४ | ८५.१६ | ८४३५२ | १४.८४ | ५६८३२६ (२६६.२८) |
| १९७६-७७ | ३४१००० | ८३.४८ | ६७५०० | १६.५२ | ४०८५०० (१९४.४०) |
| १९७७-७८ | २६६७०० | ७९.९९ | ६६७०० | २०.०१ | ३३३४०० (१५६.२१) |
| १९७८-७९ | २५२३०० | ८०.०४ | ६२९०० | १९.९६ | ३१५२६० (१४७.७१) |
| १९७९-८० | २२७०४० | ७५.९७ | ७१०८० | २४.०३ | २९८८३१ (१४०.०१) |
| १९८०-८१ | १४७२३० | ७४.३१ | ५०९०० | २५.६९ | १९८१३० (९२.८३) |
| १९८१-८२ | १२९७४३ | ७५.३५ | ४२४८३ | २४.६५ | १७२१५० (८०.६६) |

तक्ता पुढे चालू...

तक्ता क्रमांक ४.११ मागील पानावरून

| वर्ष | अल्पमुदत कर्ज थकबाकी | | मध्यममुदत कर्ज थकबाकी | | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| | रक्कम रू. | टक्केवारी | रक्कम रू. | टक्केवारी | रक्कम रूपये |
| १९८२-८३ | ७४९३८० | ९३.४१ | ५२८३८ | ६.५९ | ८०२२१८ (३७५.८७) |
| १९८३-८४ | ५८१२०० | ८८.६४ | ७४५०० | ११.३६ | ६५५७०० (३०७.२२) |
| १९८४-८५ | २९२३०० | ८३.६८ | ५७००० | १६.३२ | ३४९३०० (१६३.६६) |
| १९८५-८६ | १३९४०० | ८६.३२ | २२१०० | १३.६८ | १६१५०० (७५.६६) |

(कंसातील आकडे वाढीचे निर्देशांक आहेत)

-0-0-0-

थकबाकीतील वाढ ही १९७०-७१ पेक्षा सुमारे चार पटीने जास्त आहे. पुन्हा १९८५-८६ पर्यंत वेगाने थकबाकी कमी झाली आहे. या काळात ३७५.८७ वरून ७५.६६ पर्यंत निर्देशांक कमी झाल्याचे दिसून येते (तक्ता क्रमांक ४.११). यावरून एखाद्याच वर्षी एकूण थकबाकी मोठया प्रमाणात वाढलेली आहे व पुढील काळात सतत कमी झाल्याचे दिसते. उदा.१९८२-८३ यावर्षी नैसर्गिक आपत्ती (गारपीट) यामुळे बहुतेक द्राक्षाबागांचे नुकसान झाले त्यामुळे सदर कर्जाची वसुली झाली नाही.

अल्पमुदत कर्जाच्या थकबाकीचे एकूण थकबाकी रकमेशी १९७०-७१ ते १९८५-८६ या संपूर्ण काळामध्ये सरासरी टक्केवारी ८० इतकी आहे तर मध्यम मुदत कर्जाची सरासरी टक्केवारी २० इतकी आहे. यावरून एकूण थकबाकीमध्ये अल्पमुदत कर्जाचा हिस्सा जास्त आहे हे स्पष्ट होते.

## थकबाकीचे कर्ज उभारणीशी प्रमाण:

तक्ता क्रमांक ४.१२ मध्ये १९७७-७८ ते १९८५-८६ या काळातील थकबाकीचे अल्प मुदती व मध्यम मुदती कर्ज उभारणीशी असणारे प्रमाण स्पष्ट केले आहे. अल्प मुदती कर्ज थकबाकीचे अल्पमुदती कर्जासाठीच्या एकूण कर्ज उभारणीशी प्रमाण कमी झालेले आहे. १९७७-७८ ते १९८५-८६ या काळात हे प्रमाण ११.४८ टक्के वरून ४.४७ टक्के पर्यंत कमी झाले आहे. मात्र १९८२-८३ व १९८३-८४ यावर्षी हे प्रमाण जास्त आहे ते अनुक्रमे २५.३६ टक्के व २१.२३ टक्के असे आहे (तक्ता क्रमांक ४.१२).

मध्यम मुदत कर्ज थकबाकीचे मध्यम मुदत कर्जासाठीच्या एकूण कर्ज उभारणीशी असणारे प्रमाण १९७७-७८ ते १९८५-८६ या काळामध्ये प्रतिवर्षी कमी झालेले आहे. १९७७-७८ या वर्षी ६१.८७ टक्के इतके प्रमाण

तक्ता क्रमांक ४.१२

थकबाकीचे कर्ज उभारणीशी प्रमाण - अल्पमुदती व मध्यममुदती कर्ज

(आकडे रुपयात)

| तपशील | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८६-८७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ) थकबाकी- अल्पमुदत कर्ज. | २६६७०० | २५२३०० | २२७०४० | १४७२३० | १२९७४३ | ७४९३८० | ५८१२०० | २९२३०० | १३९४०० |
| ब) अल्पमुदत कर्जासाठीची एकूण कर्ज उभारणी. | २३२३२२५ | २०४३१२४ | १४१६९०२ | २४६१३२२ | ४०४८८९७ | २९५५०२२ | २७३६८५५ | २८६८४९९ | ३११६४०८ |
| क) थकबाकी- मध्यममुदत कर्ज. | ६६७०० | ६२९०० | ७१०८० | ५०९०० | ४२४८३ | ५२८३८ | ७४५०० | ५७००० | २२१०० |
| ड) मध्यममुदत कर्जासाठीची एकूण कर्ज उभारणी. | १०७७९० | ८००० | १९३२८६ | ६९३५३४ | १२४७२८० | ८७२६६९ | ६६९९२३ | ९७७७२१ | २४३१६८८ |
| इ) अ चे ब शी शेकडा प्रमाण. | ११.४८ टक्के | १२.३५ टक्के | १६.०२ टक्के | ५.९८ टक्के | ३.२० टक्के | २५.३६ टक्के | २१.३३ टक्के | १०.१९ टक्के | ४.४७ टक्के |
| ई) क चे ड शी शेकडा प्रमाण. | ६१.८७ टक्के | - | ३६.७७ टक्के | ७.३४ टक्के | ३.४१ टक्के | ६.०५ टक्के | ११.१२ टक्के | ५.८३ टक्के | ०.९१ टक्के |

होते आणि या काळात हे प्रमाण इतर सर्व वर्षांच्या तुलनेत जास्त होते. १९८५-८६ यावर्षी मध्यम मुदत थकबाकीचे मध्यम मुदत कर्ज उभारणीशी प्रमाण ०.९१ टक्के होते. १९८०-८१ ते १९८५-८६ या काळात सुमारे १० टक्के पेक्षा हे प्रमाण कमी आहे (तक्ता क्रमांक ४.१२). यावरून थकबाकीचे कर्ज उभारणीशी असणारे प्रमाण दरवर्षी कमी होते आहे असे निदर्शनास येते.

थकबाकीचे विलंबकालाप्रमाणे वर्गीकरण:

अल्पमुदत कर्ज:

थकबाकीचे विलंब काळाप्रमाणे वर्गीकरण (अल्पमुदत कर्ज) तक्ता क्रमांक ४.१३ मध्ये दाखविले आहे. एक वर्ष, किंवा त्यापेक्षा कमी काळाची थकबाकीचे एकूण थकबाकीशी असणारे प्रमाण १९७५-७६ यावर्षी ८४.२२ टक्के इतके आहे. एक वर्ष पर्यंतच्या थकबाकीची रक्कम १९७५-७६ ते १९८५-८६ या काळात रू.४०६.९ हजारावरून रू.४१.४ हजारापर्यंत कमी झालेली आहे. याच काळामध्ये अशाप्रकाराच्या थकबाकीचे एकूण थकबाकीशी असणारे प्रमाण ८४.२२ टक्के पासून २८.१२ टक्के पर्यंत कमी झालेले आहे. १९८१-८२ ते १९८३-८४ या काळात हेच प्रमाण ५०.१९ टक्के पासून ८८.१६ टक्के पर्यत वाढले आहे व थकबाकीची रक्कम रू.६५.१ हजारापासून रू.५१२.४ हजारापर्यंत वाढली आहे (तक्ता क्रमांक ४.१३).

एक वर्ष ते दोन वर्ष यामधील काळातील एकूण थकबाकीची रक्कम १९७५-७६ यावर्षी रू.५७.८ हजार इतकी होती. या प्रकारच्या थकबाकीची रक्कम आणि एकूण थकबाकीशी असणारे प्रमाण संपूर्ण काळामध्ये कमी जास्त झालेले आहे. दोन वर्ष ते तीन वर्ष या काळातील थकबाकीचे एकूण

तक्ता क्रमांक ४.१३

-: विलंबकालाप्रमाणे थकबाकीचे वर्गीकरण (अल्पमुदत कर्जे) :-

(हजार रूपये)

| विलंबकाल | १९७५-१९७६ | | १९७६-१९७७ | | १९७७-१९७८ | | १९७८-१९७९ | | १९७९-१९८० | | १९८०-१९८१ | | १९८१-१९८२ | | १९८२-१९८३ | | १९८३-१९८४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % | रक्कम | % |
| १) एक वर्षापर्यंत | ४०६.९ | ८४.२२ | १६१.२ | ४७.२७ | १०२.९ | ३८.५८ | १७२.५ | ६८.४० | १५५.३ | ६४.४१ | ४१.४ | २८.१२ | ६५.१ | ५०.११ | ७३७.१ | ९८.४६ | ५१२.४ | ८८.१६ |
| २) एक वर्षापेक्षा अधिक व दोन वर्षापेक्षा अधिक. | ५७.८ | ११.९० | १२७.१ | ३७.२७ | ३६.१ | १३.५४ | ११.७ | ४.६४ | २२.४ | १०.० | ८७.१ | ५९.१८ | ५९.५ | ४५.८८ | ९.४ | १.२५ | ४९.१ | ८.५१ |
| ३) दोन वर्षापेक्षा अधिक व तीन वर्षापेक्षा कमी. | १९.२ | ३.८८ | ३४.५ | १०.१२ | ८२.५ | ३०.९३ | १.५ | ०.५९ | ६.६ | २.९१ | ६.६ | ४.४८ | - | - | २.१ | ०.२९ | १८.१ | ३.२५ |
| ४) तीन वर्षापेक्षा अधिक. | - | - | १८.२ | ५.३४ | ४५.२ | १६.९५ | ६६.५ | २७.३७ | ४२.४ | १८.६८ | १२.१ | ८.२२ | ५.१ | ३.९३ | - | - | - | - |
| एकूण | ४८३.१० | १०० | ३४१.० | १०० | २६६.७ | १०० | २५२.२ | १०० | २२७.० | १०० | १४७.२ | १०० | १२९.७ | १०० | ७४९.४ | १०० | ५८१.२ | १०० |

थकबाकीशी प्रमाण १९७५-७६ ते १९७७-७८ या काळात ३.८८ टक्के पासून ३०.९३ टक्के पर्यंत वाढले आहे. तर रक्कम १९.२ हजारापासून ८२.५ हजारापर्यंत वाढली आहे. १९७८-७९ ते १९८३-८४ या काळात या प्रकारच्या थकबाकीची रक्कम व एकूण थकबाकीशी प्रमाण सतत कमी जास्त झाले आहे (तक्ता क्रमांक ४.१३).

तीन वर्षांपेक्षा जास्त काळ असणा-या अल्पमुदत कर्ज थकबाकीची रक्कम १९७६-७७ ते १९७८-७९ या काळात रू.१८.२ हजारापासून रू.६६.५ हजारापर्यंत वाढली आहे. तर एकूण थकबाकीशी असणारे प्रमाण याच काळात ५.३४ टक्के पासून २६.३७ टक्के पर्यंत वाढले आहे. १९७८-७९ ते १९८१-८२ या काळात थकबाकीची रक्कम रू.६६.५ हजारावरून रू.५.१ हजारापर्यंत आणि प्रमाण २६.३७ टक्के पासून ३.९३ टक्के पर्यंत कमी झाले आहे.१९८२-८३ आणि १९८३-८४ या काळात या प्रकारची थकबाकी नाही (तक्ता क्रमांक ४.१३).

मध्यम मुदत कर्ज:

मध्यम मुदत कर्जाच्या थकबाकीचे विलंबकालाप्रमाणे वर्गीकरण तक्ता क्रमांक ४.१४ मध्ये केले आहे. एक वर्ष पर्यंतच्या काळातील थकबाकीची रक्कम व एक वर्ष ते दोन वर्ष या काळातील थकबाकीची रक्कम १९७५-७६ या वर्षी अनुक्रमे रू.२८ हजार व रू.३७.१ हजार इतकी आहे. एक वर्ष पर्यंतच्या काळातील थकबाकीचे प्रमाण १९७५-७६ ते १९७८-७९ या काळात ३३.१७ टक्के पासून १८.४९ टक्के पर्यंत कमी झाले आहे आणि १९७९-८० ते १९८२-८३ या काळात ३१.६१ टक्के पासून ५७.७६ टक्के पर्यंत वाढले आहे.

एक वर्ष ते दोन वर्ष यामधील काळातील थकबाकीची रक्कम पाहणीकाळात रू.३७.१ हजारापासून रू.८.९ हजारपर्यंत कमी झाली आहे.

## तक्ता क्रमांक ४.१४

-: विलंबकालाप्रमाणे थकबाकीचे वर्गीकरण (मध्यममुदत कर्ज) :-

(हजार रूपये)

| विलंबकाल | १९७५-७६ | १९७६-७७ | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १) एक वर्षापर्यंत | २८.० | १४.५ | १३.८ | ११.८ | २२.७ | ०.७ | १४.१ | ३०.५ | ४१.० |
| | (३३.१७) | (२१.४८) | (२०.६९) | (१८.४९) | (३१.६१) | (१.३७) | (३३.२५) | (५७.७६) | (५४.९६) |
| २) एक वर्षापेक्षा अधिक व दोन वर्षापेक्षा कमी | ३७.१ | ७.० | २.० | ८.१ | १०.७ | १३.५ | ४.१ | ७.६ | ८.९ |
| | (४३.९६) | (१०.३८) | (३.०) | (१२.७९) | (१४.११) | (२६.५३) | (९.६७) | (१४.३९) | (११.९३) |
| ३) दोन वर्षापेक्षा अधिक व तीन वर्षापेक्षा कमी. | १९.३ | ३३.२ | ६.८ | - | ४.२ | १३.८ | ७.९ | १४.७ | १०.४ |
| | (२२.८७) | (४९.१८) | (१०.१९) | - | (५.७१) | (२७.११) | (१८.६३) | (२७.८५) | (१३.९५) |
| ४) तीन वर्षापेक्षा अधिक. | - | १२.८ | ४४.१ | ४३.९ | ३४.३ | २२.९ | १६.३ | - | १४.३ |
| | ( - | (१८.९६) | (६६.१२) | (६८.८१) | (४७.७७) | (४४.९९) | (३८.४५) | - | (१९.१६) |
| एकूण | ८४.४ | ६७.५ | ६६.७ | ६३.८ | ७१.८ | ५०.९ | ४२.४ | ५२.८ | ७४.६ |
| | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

(कंसातील आकडे शेकडा प्रमाण दाखवितात)

आणि एकूण थकबाकीशी असणारे प्रमाण ४३.९६ टक्के पासून ११.९३ टक्के पर्यंत कमी झाले आहे. दोन वर्षे ते तीन वर्षे यामधील काळातील थकबाकीची रक्कम आणि एकूण थकबाकीशी असणारे तिचे प्रमाण यामध्ये प्रतिवर्षी कमी जास्त बदल झाला आहे (तक्ता क्रमांक ४.१४). तीन वर्षापेक्षा अधिक काळ आहे अशा थकबाकीची रक्कम आणि तिचे एकूण थकबाकीशी असणारे प्रमाण १९७८-७९ पर्यंत वाढले आहे. १९७८-७९ यावर्षी रु.४३.९ हजार इतकी अशी थकबाकीची रक्कम होती तर प्रमाण ६८.११ टक्के इतके होते. १९७९-८० ते १९८३-८४ या काळात थकबाकीची रक्कम रु.३४.३ हजारापासून रु.१४.३ हजारापर्यंत कमी झाली आहे व एकूण थकबाकीशी प्रमाण ४७.७७ टक्के पासून १९.१६ टक्के पर्यंत कमी झाले आहे.

अशात-हेने सर्वच प्रकारातील थकबाकीची रक्कम आणि प्रमाण पाहणी काळामध्ये कमी जास्त झालेले आहे. तथापि एकूण थकबाकीचे प्रमाण अल्पच दिसून येते. पर्यायाने संस्था व कर्जदार या दोन्ही बाबतीत कार्यक्षमतेचा पुरावा या थकबाकीच्या अल्प प्रमाणामुळे मिळतो. सामान्यत: ज्या काळात पाऊसपाणी कमी आहे किंवा इतर प्रकारची नैसर्गिक आपत्ती असते त्यावर्षी व नंतर एक दोन वर्षे थकबाकीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.

-0-0-0-0-

संदर्भ अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप या संस्थेचे वार्षिक अहवाल व कार्यालयीन हिशोब पुस्तके व कागदपत्रे.